सातारा, दि.०९

शिक्षणाच्या विस्ताराबरोबर गुणवत्ताही तेवढीच महत्वाची असून यामुळे प्रगतीला दिशा देण्याचे काम होत असते म्हणुनच या दोन्ही बाबींचा कटाक्षाने विचार करून शिक्षण क्षेत्रात रयत शिक्षण संस्था राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे कार्य कायम करत राहिल, अशी ग्वाही रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व केंद्रीय कृषी मंत्री शरदराव पवार यांनी आज सातारा येथे दिली. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पदमभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ५५ व्या पुण्यतिथीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

ना. पवार पुढे म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विविध क्षेत्रांकरिता विज्ञानाला जोड धरणे आवश्यक ठरत आहे. काळानुसार गरजाही बदलत असल्याने नवनवीन आव्हाने उभी राहत आहेत. या मध्ये यशस्वी होण्यासाठी प्रत्येक शिक्षक प्राध्यापकांची संशोधक व जिज्ञासू वृत्ती वाढली पाहिजे. विज्ञानाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाल्याने त्याच्या माध्यमातून विकासाची कास धरली पाहिजे असे सांगून रयत शिक्षण संस्थेतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी समाजामाध्ये आपले योगदान देत आहे याचा संस्थेला अभिमान आहे. ज्ञानी मुले देशाची खरी संपत्ती असते हे कर्मवीर अण्णांनी ओळखले होते, त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने कर्मवीर अण्णांचे आदर्श घेवून गुणवत्ता संपन्न विद्यार्थी घडविण्याचे काम कर्तव्याने केले पाहिजे, असेही ना. शरद पवार यांनी यावेळी म्हंटले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री डॉ. पतंगराव कदम, ना. शशिकांत शिंदे, माजी मंत्री बबनराव पाचपुते, लक्ष्मणराव ढोबळे, ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील, रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे, उपाध्यक्ष डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, शंकरराव कोल्हे, महाराष्ट्र प्रदेश युवक कॉग्रेसचे अध्यक्ष विश्वजित कदम, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विलासराव पाटील, संस्थेच्या समन्वय समितीचे सदस्य अरूणशेठ भगत, जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, जी. आर. पाटील, वाय. टी. देशमुख, पी. जे. पाटील, सुरेश पाटील, विश्वनाथ कोळी आदी मान्यवरांसह हजारोंच्या संख्येने रयतसेवक उपस्थित होते. यावेळी ॲड. रावसाहेब शिंदे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा आपल्या भाषणातून विषद केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव अरविंद बुरूंगळे यांनी तर आभार प्रदर्शन नानासाहेब गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा तसेच विद्यालयांचा सत्कार करण्यात आला.

माजी खासदार दानशूर नेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल तालुक्यातील रिटघर येथील न्यू इंग्लिश स्कूलला दत्तक घेवून अत्यंत दुरावस्था झालेल्या या शाळेच्या इमारतीकरिता ०१ कोटी ३८ लाख रूपयांची देणगी दिली. त्यांच्या देणगीतून या शाळेला सुसज्ज इमारत आणि पुर्नजीवन मिळाले. त्याबद्दल या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांचा नामदार शरदराव पवार यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. त्याचबरोबर याच शाळेला यंदाच्या कर्मवीर पुरस्कारानेही सन्मनित करण्यात आले. हा सन्मान आमदार प्रशांत ठाकूर तसेच स्थानिक स्कूल कमिटीने स्विकारला.

यावेळी ॲड. रावसाहेब शिंदे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, रयत शिक्षण संस्थेने शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्यामुळे या संस्थेबद्दल लोकांमध्ये मोठया प्रमाणात आदर निर्माण झाला आहे. या आदरार्थी विश्वासाने संस्थेला मोठया उंचीवर नेले आहे. देशाच्या विकासासाठी शिक्षणातील प्रगती महत्वाची आहे. ज्ञान चिरकाळ प्रगतीचा पाया आणि व्यावसायिक शिक्षण विकासाचा गाभा आहे, त्यामुळे रोजगार निर्मितीक्षम आणि टॅलेंट असलेले शिक्षण देण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशिल असेल, असेही शिंदे यांनी सांगून नोबेल पुरस्कार मिळवेल असे काम केले जाईल.